पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited-2022
'B++ Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur



दि. ०५/१०/२०२४

## PET -9 (2024) 30 गुणांच्या मौखिक परीक्षेबाबत महत्वाच्या सूचना

- PET-9 प्रवेश प्रक्रियेमधील ३० गुणांच्या मौखिक परिक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर https://www.sus.ac.in/bcud/PET९ वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.
- रिक्त जागेच्या 1:3 या प्रमाणात पात्र विषयनिहाय विद्यार्थ्यांची यादी संकेत स्थळावर उपलब्ध केली आहे.
- या रिक्त जागेच्या 1:3 प्रमाणात संख्येनुसार गुणानुक्रमे मौखिक परीक्षेस विद्यार्थी पात्र झाले आहेत.
- PET-9 प्रवेश प्रक्रिये संदर्भात संबधिंत विद्यार्थ्यांनी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळास भेट देऊन अद्यावत माहिती घ्यावी.
- मौखिक परिक्षेकरिता विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळेच्या अर्धा तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- मौखिक परिक्षा या प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील विविध संकुलामध्ये आयोजित केल्या जातील.
- मौखिक परिक्षेकरिता (Interview for ३० Marks) विद्यार्थी अनुपस्थित राहिला तर तो विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमधून बाद होईल.
- विद्यार्थ्यांनी मौखिक परिक्षेकरिता येताना सर्व मुळ कागदपत्रे व त्यांच्या दोन संचामध्ये छायांकित (Photo copy) प्रती घेऊन यावेत.
- कागदपत्रे पडताळणीत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत नसल्यास संबंधीत विद्यार्थ्यास मौखिक परीक्षा देता येणार नाही. परिणामी सदर विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतून बाद होईल.
- पदव्यूत्तर पदवी (पीजी) गुणपत्रिकेवर संबंधीत पदवीसाठीचे गुण/टक्केवारी असणे आवश्यक आहे. गुणपत्रिकेवर टक्केवारी नसल्यास संबंधीत विद्यापीठ/संस्था यांच्याकडून **Equivalence Percentage Certificate** सोबत आणणे बंधनकारक असेल.

- मौखिक परिक्षेकरिता विद्यार्थ्यांनी स्वत:च्या (छायाचित्र असलेला) (Photo identity )ओळखपत्रासह प्रत्यक्षात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्यांना मौखिक परिक्षेबाबतची सर्व सूचना ई-मेल द्वारे कळविण्यात येतील. तथापी काही तांत्रिक कारणास्तव अथवा चुकीचा मेल आयडी असल्यास व माहिती प्राप्त न झाल्यास विद्यापीठस त्यास जबाबदार असणार नाही. त्यामुळे सर्वप्रकारच्या सुचनां / परिपत्रक पाहण्यासाठी https://www.sus.ac.in/bcud/PET९ या लिकंवर विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी.
- विद्यार्थ्यांनी PET पूर्व परीक्षा अर्ज सादर करत असताना दिलेल्या ई-मेल आयडी वरतीच ई-मेल द्वारे सुचना पाठविण्यात येईल. दिलेला ई-मेल आयडी चुकीचा असल्यास प्रवेशाबाबत ई-मेलव्दारे होणारा पत्रव्यवहार झाला नाही तर विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
- विद्यार्थ्यांनी मौखिक परिक्षेकरिता उपस्थित राहताना **Check List** व **Input Sheet** सह उपस्थित राहावे. (सोबत सहपत्र १ व २)
- विषयनिहाय मार्गदर्शकांची यादी व रिक्त जागाबाबतची माहिती यापूर्वीच विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.
- मौखिक परिक्षेकरिता जाहिर करण्यात आलेल्या वेळापत्रकात काही तांत्रिक कारणास्तव बदल करण्याचा सर्व अधिकार विद्यापीठाचा आहे.
- मौखिक परीक्षा संपन्न झाल्यानंतर विद्यार्थ्याची कुठलीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.
- मागास प्रवर्गातील उमेदवारांची गुणानुक्रमे जर खुल्या प्रवर्गाच्या यादीमध्येही नाव असेल अशा उमेदवारांची मौखिक परीक्षा एकदाच खुल्या प्रवर्गाच्या वेळी घेण्यात येईल.
- तसेच जर समांतर आरक्षणातील (अनाथ/दिव्यांग) उमेदवारांची गुणानुक्रमे इतर प्रवर्गाच्या यादीमध्येही नाव असेल अशा उमेदवारांची मौखिक परीक्षा संबंधीत विद्यार्थ्यांच्या वेळापत्रकाप्रमाणे एकदाच घेण्यात येईल.
- महिला आरक्षणाकरिता महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.- महिआ-२०२३/ प्र.क्र.१२३/ का-०२ दि. ०४ मे २०२३ रोजीच्या शासन निर्णय लागु राहिल.
- अनाथ (Orphan) आरक्षणासाठी महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.- अनाथ-२०२२/ प्र.क्र.१२२/ का-०३ दि. ०६ एप्रिल २०२३ रोजीच्या शासन निर्णय लागु राहिल.

- अनाथ (Orphan) विद्यार्थ्यांनी त्याचे सक्षम प्राधिकार-याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
- सर्व राखीव प्रवर्गाच्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे अन्यथा संबंधित उमेदवारास संबंधित आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. तसेच अशा विद्यार्थ्यांचा समावेश सर्वसाधारण प्रवर्गामध्ये होईल.
- एखादया प्रवर्गाचे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्या प्रवर्गाची जागा आरक्षण धोरणानुसार पुढील प्रवर्गात परावर्तित होईल.
- PET-9 लेखी परीक्षेचे संपादीत गुण व मौखिक परीक्षेचेगुण मिळून अंतिम गुणवत्तेनुसार प्रवेशाची प्रक्रीया होईल.
- PET-9 च्या पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत CAC (Central Admission Committee (**R. Ph.D. 6**)) समितीचे निर्णय अंतिम राहतील.

**आदेशावरून**